लोकमत

# शाहूंच्या इंग्रजी चरित्राचे आज प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समितीच्या वतीने प्राचार्य रा. कृ. कणबरकर लिखित 'ग्लिम्पसेस ऑफ राजर्षी शाहू महाराज' या पुस्तकाचे प्रकाशन आज, शुक्रवारी सकाळी अकरा वाजता शाहू मिलमधील समारंभात होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांनी हे पुस्तक लिहिले असून, महाराजांचे कार्य राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यासाठी हे चरित्र महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास चरित्र साधने प्रकाशन समितीचे अध्यक्ष, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला. या प्रकाशन सोहळ्याला श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्यासह महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री सतेज पाटील, सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर यांच्यासह लोकप्रतिनिधी उपस्थित असतील.

0 6 MAY 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ.डी. टी. शिर्के : रुकडी येथे व्याख्यान

# शिक्षणासाठी शाहू महाराजांचे मोठे योगदान


लोकमत न्यूज नेटवर्क

**रूकडी माणगाव** : राजर्षी शाहू महाराज हे शिक्षणासाठी अखंड प्रयत्न करणारे राजे होते. 'शिका आणि पुढे या, तरच तुमचा उद्धार होईल', असे ते म्हणत असत. आज महाराष्ट्र शिक्षणात अग्रेसर असून, त्यात राजर्षी शाहू महाराज यांचेदेखील बहुमोल योगदान होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मेजर प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

रूकडी येथे राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त 'जागर शाहू कर्तृत्वाचा' या विषयावर राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय येथे आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांतकुमार कांबळे होते.

कुलगुरू शिर्के म्हणाले, शाहू महाराजांनी कोल्हापूरसह २३ बोर्डिंग बांधली. यापैकी एक बोर्डिंग रूकडी येथे बांधून शिक्षण खेड्यापर्यंत पोहोचले पाहिजे, याकरिता ते कार्यरत राहिले. अध्यक्ष प्राचार्य प्रशांतकुमार कांबळे यांनी सांगितले की, माणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छ. शाहू महाराज यांच्या उपस्थितीत माणगाव परिषद झाली. या परिषदेमुळे संपूर्ण देशात सामाजिक बदल झाला. यावेळी ग्रंथ प्रदर्शन व 'उत्कर्ष' या वार्षिक अंकाचे प्रकाशन शिर्के यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला इचलकरंजी रोटरीचे अध्यक्ष भंडारी, प्राचार्या उज्ज्वला बुल्ले, सरपंच रफिक कलावंत, माजी उपसरपंच शमुवेल लोखंडे, उपस्थित होते.



रुकडी येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये प्राचार्य प्रशांतकुमार कांबळे यांच्या संकल्पनेतून महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी मोफत बेसिक टेंलरिग कोर्सचा शुभारंभ कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यासाठी रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी यांनी विशेष योगदान दिले असून, महाविद्यालयाने मुलींना महाविद्यालयीन शिक्षणासह आर्थिक पाठबळ मिळावे याकरिता सुरु केलेल्या या योजनेची कुलगुरुंनी प्रशंसा केली.

लोकमत

# विद्यापीठात शाहूंच्या जीवनकार्याचा जागर

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी राजर्षी शाहूंच्या कार्यावर आधारित विशेष पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याला अभिवादन करणारे पथनाट्य विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सादर केले. त्यामध्ये शाहू महाराजांच्या समग्र जीवनकार्याचा आढावा कल्पकतेने घेण्यात आला.

06 MAY 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू महाराजांसाठी कोल्हापूर आज होणार स्तब्ध

## राजर्षी शाहू स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्व : सकाळी १० वाजता १०० सेकंद जागीच थांबणार



लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दीनांचे कैवारी, रयतेचे राजे, पुरोगामी चळवळीचे प्रणेते, संस्थानातील जनतेला सुखी करण्यासाठी दूरदृष्टीने निर्णय घेणारा लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन करण्यासाठी आज, शुक्रवारी सकाळी १० वाजता १०० सेकंदासाठी कोल्हापूर स्तब्ध होणार आहे. राजर्षी शाहू स्मृती शताब्दीनिमित्त पालकमंत्री सतेज पाटील व जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित कार्यक्रमांतर्गत शाहू समाधिस्थळ येथे उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन होईल. त्यानंतर शाहू मिल येथे मुख्य समारंभ होणार आहे. शाहू महाराजांच्या जागराने अवघे कोल्हापूर शाहूमय झाले आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी अवघ्या २८ वर्षांच्या राज्य कारकिर्दीत डोंगराएवढे काम करून कोल्हापूरला विकासाचे रोल मॉडेल करण्याच्यादृष्टीने पावले उचलली. धाडसी निर्णय घेतले. त्यांच्या या दूरदृष्टीची फळे आजही कोल्हापूर चाखत आहे. या लोकराजाचा मृत्यू ६ मे १९२२ रोजी झाला. या घटनेला शुक्रवारी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या स्मृती शताब्दी वर्षात त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी २२ मे पर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य कार्यक्रम आज, शुक्रवारी होत आहेत.

सकाळी सात वाजता शहरातून समता फेरी काढण्यात येईल. त्यानंतर सकाळी ठीक १० वाजता कोल्हापूरकर १०० सेकंदांसाठी स्तब्ध राहून शाहू महाराजांना आदरांजली वाहतील. शाहू समाधिस्थळ येथे शासकीय अभिवादनाचा कार्यक्रम होईल. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, सांस्कृतिक मंत्री अमित देशमुख यांच्यासह राज्यातील प्रमुख नेते, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी उपस्थित राहतील. या अभिवादनानंतर सकाळी साडेदहा वाजता मान्यवरांचे शाहू मिलमध्ये आगमन होईल. येथे मुख्य समारंभ होईल. दुपारी चार वाजता मंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते राज्य नाट्य स्पर्धेचा शुभारंभ होणार आहे. तर खासबाग मैदानात सायंकाळी तालवाद्यांच्या माध्यमातून सुप्रसिद्ध कलाकार शाहू महाराजांना आदरांजली वाहणार आहेत.

### कोल्हापुरात फक्त शाहूंचा जागर

शाहू कृतज्ञता पर्व अंतर्गत १८ एप्रिलपासून जिल्ह्यात शाहू महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा जागर करणारे उपक्रम घेतले जात असून, महाराजांनी स्थापन केलेली ऐतिहासिक बांधणीची शाहू मिल २० वर्षांनी सर्वसामान्यांसाठी खुली झाली आहे. शाहूकालीन छायाचित्र, कलाकारांनी रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शन, गुजरी सुवर्णजत्रा, १०० व्याख्याने असे उपक्रम झाले आहेत. तर पुढील नियोजनात मिरची मसाला जत्रा, कापड जत्रा, कुस्त्यांचे मैदान असे अनेकविध कार्यक्रम होणार आहेत.

0 6 MAY 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू विचारांच्या समाजासाठी नव्या पिढीने पुढे येणे गरजेचे

## यशवंतराव थोरात यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जगभरात अनेक राजे होऊन गेले. त्यातील काहींनी लोककल्याणाचे कार्य केले. मात्र, या सर्वांपेक्षा राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे वेगळे होते. प्रजेची सुख, दुःखे स्वत: अनुभवून त्यांनी समाज घडविण्याचे काम केले. शाहू महाराजांचे हेच विचार आत्मसात करून नव्या पिढीने जातीभेद विरहित समतेवर आधारित समाज घडवण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन ज्येष्ठ अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी गुरुवारी येथे केले.



कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठात लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त ज्येष्ठ अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांचे व्याख्यान झाले. यावेळी डावीकडून व्ही. एन. शिंदे, संजयसिंह चव्हाण, राहुल रेखावार, जयसिंगराव पवार, शाहू छत्रपती, भारती पाटील उपस्थित होत्या. (छाया : नसीर अत्तार)

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त जिल्ह्यात गुरुवारी सकाळी अकरा वाजता 'जागर शाहू कर्तृत्वाचा' या विषयावर शंभर व्याख्याने आयोजित केली होती. त्यातील मुख्य व्याख्यान शिवाजी विद्यापीठात झाले. त्यामध्ये डॉ. थोरात यांनी 'राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व कार्य' या विषयावर विचार मांडले. राजर्षी शाहू सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, तर शाहू छत्रपती, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण प्रमुख उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, शाहूंनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रशस्त केले. त्यांनी मदत केलेल्या कुटुंबांतील पिढ्या सध्या काय करत आहेत. त्यांच्यावर शाहू विचारांचा काय परिणाम झाला आहे. त्याचा संशोधकांनी अभ्यास करावा. दीडशे वर्षांपूर्वी राजर्षींनी केलेले कार्य आणि सध्या शासन, प्रशासनाकडून सुरू असलेल्या कामाचा तुलनात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे. शाहू छत्रपती म्हणाले, नुसते बोलून, ऐकून चालणार नाही, तर शाहू विचारांचा वारसा पुढे नेण्याची आणि त्यानुसार सर्वांनी कार्यरत राहण्याची गरज आहे. डॉ. पवार म्हणाले, मी राजा आहे असा विचार राजर्षी शाहूंचा नव्हता. लोकांना समजून घेऊन त्यांच्यामध्ये आत्मभान निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. त्यामुळे ते लोकराजा होते. शाहू-फुले-आंबेडकर हे विचारांच्या माध्यमातून यापुढेही अखंड राहणार आहेत. त्यांचे विचार नव्या पिढीने समजून घेतले, तर समता, धर्मनिरपेक्षतेवर आधारित राष्ट्रउभारणीचे काम सहजपणे साध्य होईल. या कार्यक्रमास उषा थोरात, बाळ पाटणकर, रमाकांत भिंगार्डे, उदय गायकवाड आदी उपस्थित होते.

### देशाचा सामाजिक नकाशा बदलला असता

१८ व्या शतकात राजर्षी शाहू महाराज हे जर, दिल्लीच्या तख्तावर असते तर देशाचा सामाजिक नकाशा निश्चितपणे बदलला असता, असे डॉ. पवार यांनी सांगितले. शाहू विचारांनी तरुणाईने समतेसाठी लढा द्यावा. माणुसकीवर आयुष्यभर विश्वास ठेवावा, असे आवाहन डॉ. थोरात यांनी केले.

### शंभर नव्हे, ३५० व्याख्याने!

स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वअंतर्गत गुरुवारी एकाचवेळी कोल्हापूर शहरात आणि जिल्ह्यात शंभर ठिकाणी व्याख्यानांचे आयोजन प्रशासनाने केले होते. तथापि, शाहू महाराजांच्या प्रेमापोटी तब्बल ३५० ठिकाणी व्याख्यानांचे आयोजन केल्याचे जिल्हाधिकारी रेखावार यांनी सांगितले. विद्यापीठातील मुख्य व्याख्यानानंतर सिद्धनेर्ली येथील शाहीर सदाशिव निकम यांनी शाहू महाराज यांचा पोवाडा सादर केला.

0 6 MAY 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एक दिवा लोकराजासाठी...

## स्मृती शताब्दीच्या पूर्वसंध्येला कँडल मार्चद्वारे शाहू महाराज समाधिस्थळी अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू महाराजांच्या ६ मे या स्मृती शताब्दी दिनाच्या पूर्वसंध्येला शहरातून कँडल मार्च काढण्यात आला. दसरा चौकातील शाहू महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून सर्वजण पायी समाधिस्थळाकडे रवाना झाले. सायंकाळी साडेसातच्या सुमारास समाधिस्थळी सर्वत्र पणत्या प्रज्वलित करण्यात आल्या. यावेळी सर्व परिसर प्रकाशमान बनला होता.

पालकमंत्री सतेज पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे, महापालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, मधुरिमाराजे यांच्या प्रमुख उपस्थितीत दसरा चौकातून कँडल मार्चला सुरुवात झाली. अग्रभागी मशालधारी मुली, त्यापाठोपाठ महिला, वैद्यकीय महाविद्यालय, एनसीसीचे छात्र, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांच्यासह विविध तालीम संस्था, तरुण मंडळे, संस्था, संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

'राजर्षी शाहू महाराज की जय'... 'एकच राजा, शाहू राजा'... 'कोल्हापूरचे भाग्यविधाते शाहूराजे'... अशा घोषणा देण्यात येत होत्या. नर्सरी बागेतील समाधिस्थळी पोहोचल्यानंतर समाधीच्या चोहोबाजूंना पणत्या प्रज्वलित करण्यात आल्या. तसेच प्रमुखांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्व परिसर प्रकाशाने न्हाऊन निघाला.



कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृती शताब्दीच्या पूर्वसंध्येला नर्सरी बागेतील समाधिस्थळी मेणबत्त्या प्रज्वलित करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातील विविध तालीम संस्था, पक्ष, संघटनांचे पदाधिकारी, महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. (छाया : पप्पू अत्तार)

### शंभर सेकंद आदरांजलीचे... शाहूरायांप्रति कृतज्ञतेचे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये, अधिविभागांतील विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यासह शैक्षणिक व्यासपीठ, मुख्याध्यापक संघ, शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी, पालक ६ मे रोजी सकाळी १० वाजता शंभर सेकंद स्तब्धता पाळून लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन करणार आहेत. लोकराजाप्रति कृतज्ञता म्हणून ६ मे रोजी सकाळी दहा वाजता शंभर सेकंद स्तब्धता पाळून लोकराजास अभिवादन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी प्रजेसाठी आयुष्य खर्ची घातले. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना सकाळी १० वाजता १०० सेकंद असेल त्या ठिकाणी स्तब्ध उभे राहून वंदन करूया, असे आवाहन जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाचे अध्यक्ष एस. डी. लाड यांनी केले आहे.





१) दसरा चौकातून गुरुवारी सायंकाळी निघालेल्या कँडल मार्चमध्ये सहभागी मशालधारी महिला. २) शाहू महाराजांच्या समाधिस्थळी मेणबत्ती प्रज्वलित करून अभिवादन करताना वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी.

# महाविद्यालयांकरिता बिंदुनामावली शिबिराचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठांतर्गत दि. ९ ते १३ मे या कालावधीत महाविद्यालयांकरिता विशेष कक्षाचे बिंदुनामावली तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठाने शिक्षक पदांच्या भरतीसंदर्भात बिंदुनामावलीची तपासणी शिबिर आयोजित केले आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील बिंदुनामावली तपासण्यासाठी उपकुलसचिव, विशेष कक्ष यांच्या नेतृत्वाखाली दोन पथके तयार करण्यात आलेली आहेत. आवश्यक कागदपत्रांची यादी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

0 6 MAY 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समतावादी आरक्षणाचे जनक

**कोल्हापूर संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखून ठेवणारा इतिहासप्रसिद्ध व अभूतपूर्व जाहीरनामा महाराजांनी काढला. भारताच्या इतिहासातील राज्यकर्त्यांनी काढलेला अशा प्रकारचा हा पहिलाच जाहीरनामा होय. त्यामुळेच राजर्षी शाहू महाराज यांना 'समतावादी आरक्षणाचे जनक' म्हटले पाहिजे.**

**प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन**

जातिव्यवस्था हे भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण बनून गेले होते. वर्णाधारित धर्मव्यवस्थेने विशिष्ट लोकांना विशेषाधिकार व बहुसंख्य लोकांना गुलामीची स्थिती निर्माण करून दिली आणि जातीची उतरंड वाट्याला आली. आधुनिक काळात महात्मा ज्योतिराव फुले यांनी या व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले. जातिव्यवस्था घालविण्यासाठी व वंचितांना हक्क मिळण्यासाठी विविध जातींच्या लोकांना शिक्षण व नोकरीमध्ये प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, अशी मांडणी त्यांनी केली. त्यामुळे आरक्षणाची संकल्पना (Idea of Reservation) फुल्यांनी मांडली, असे म्हणावे लागते. आरक्षण प्रत्यक्ष राबवून राजर्षी शाहूंनी आपल्या संस्थानात त्याचे प्रात्यक्षिक (Practice of Reservation) करून दाखविले. भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाला धोरणाचे (Policy of Reservation) स्वरूप दिले. विषमतावादी समाजव्यवस्थेला वठणीवर आणण्यासाठी राजर्षी शाहू छत्रपती यांनी कमालीच्या चिकाटीने व धैर्याने कार्य केले. त्यांनी १८९४ ते १९२२ या २८ वर्षांच्या कालखंडात अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही ध्येयनिष्ठेने, कळकळीने व 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या तत्त्वप्रणालीने समाजपरिवर्तनाचे कार्य केले. गौतम बुद्धाच्या विचाराची पेरणी करून जसे सम्राट अशोकाने कल्याणकारी राज्य केले, तसे महात्मा फुले यांच्या विचारांची पेरणी करून कल्याणकारी राज्य करणारा शाहू राजा इतिहासात एकमेवाद्वितीय ठरला.

राजर्षी शाहू यांनी राज्यारोहणानंतर आपल्या संस्थानामध्ये विविध सुधारणा करण्यास सुरुवात केली. अनुभव आणि निरीक्षण यांच्या आधारे वस्तुस्थितीची जाणीव त्यांना झाली होती. संस्थानातील समस्यांची नेमकी उकल करून त्यावर उपाययोजना करण्यास त्यांनी सुरुवात केली होती. भास्करराव जाधव यांनी नमूद केल्याप्रमाणे, १९०१ साली मराठा जातीतील दोन विद्यार्थी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले होते; पण त्यांना साधी शिक्षकाची नोकरी मिळाली नव्हती. त्या काळात सातवी उत्तीर्ण असणाऱ्याला शिक्षकाची नोकरी मिळत असे. मात्र, या लायक तरुणांपैकी एकाला अर्धवेळ ग्रंथपालाची व दुसऱ्याला मुकादमाची नोकरी देण्यात आली होती. ९५ टक्के नोकऱ्यांमध्ये ब्राह्मण जातीचे लोक होते व त्यांचे मत होते की, मराठा समाजातील लोकांना शिक्षक म्हणून नेमले तर शिक्षणाचा दर्जा ढासळेल. हे चित्र पाहिले तर बाकी मागासलेल्या जातींची अवस्था फारच बिकट होती असे दिसून येते.

२६ जुलै १९०२ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी एक हुकूम जारी केला. तो संपूर्ण देशाच्या इतिहासात एक क्रांतिकारी जाहीरनामा म्हणून महत्त्वाचा ठरला. शाहूंचे चरित्रकार धनंजय कीर यांनी या जाहीरनाम्याचे वर्णन 'नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत' अशा शब्दांत केले आहे. या आदेशाच्या सुरुवातीस आपल्या प्रजेबाबतची कणव स्पष्ट करणारा परिच्छेद दिला आहे. त्यात म्हटले आहे, 'सध्या कोल्हापूर संस्थानामध्ये सर्व वर्णांच्या प्रजेस शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत; परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकांच्या स्थितीत सदरहू प्रयत्नास जितके यावे तितके यश आले नाही, हे पाहून सरकारास फार दिलगिरी वाटते.'

या जाहीरनाम्यामध्ये असे म्हटले आहे की, 'हा हुकूम पोहोचल्या तारखेपासून रिकाम्या झालेल्या जागेपैकी शेकडा ५० जागा मागासलेल्या लोकांस भराव्या. ऑफिसमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अंमलदारांचे प्रमाण सध्या शेकडा ५० पेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक या वर्गातील व्यक्तीची करावी. याच हुकूमामध्ये 'मागासलेल्या वर्णाचा अर्थ ब्राह्मण, परभू, शेनवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण, खेरीज सर्व वर्ण असा समजावा,' असा दिला आहे. याचा अर्थ राजर्षी शाहूंनी मराठा जातीसह सर्व मागासांसाठी ५० टक्के नोकऱ्या राखीव ठेवल्या. या आधुनिक आरक्षण धोरणाचा पहिला लाभार्थी एक मराठा व्यक्ती होता. कोल्हापूर संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखून ठेवणारा इतिहासप्रसिद्ध व अभूतपूर्व जाहीरनामा महाराजांनी काढला. भारताच्या इतिहासातील राज्यकर्त्यांनी काढलेला अशा प्रकारचा हा पहिलाच जाहीरनामा होय. त्यामुळेच राजर्षी शाहू महाराज यांना 'समतावादी आरक्षणाचे जनक' म्हटले पाहिजे.

आरक्षण धोरणांतर्गत नियुक्त केलेल्या बहुजन समाजातील विविध जातींच्या कर्मचाऱ्यांशी उच्चवर्णीय अधिकाऱ्यांनी कसे वागावे, यासंदर्भात राजर्षी शाहू छत्रपतींची एक खास आज्ञा आजच्या प्रशासकांनाही आदर्श व मार्गदर्शक वाटावी अशी आहे. त्यात ते म्हणतात, 'कोल्हापूर इलाख्यातील रेव्हेन्यू ज्युडिशियल आदिकरून सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी करतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्याची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्याने हा हुकूम पोहोचल्यापासून सहा आठवड्यांच्या आत नोटीस देऊन राजीनामा द्यावा. त्याला पेन्शन मिळणार नाही. अशी आमची इच्छा आहे की, आमच्या राज्यातील कोणाही इसमाला जनावरांप्रमाणे न वागविता मनुष्य प्राण्याप्रमाणे वागवावे.' मातेच्या ममतेने प्रजेवर प्रेम करणारा राजर्षी शाहू यांच्यासारखा राजा दुर्मीळ होय. पण या जाहीरनाम्यानंतर प्रा. विजापूरकर यांच्या नेतृत्वात ब्राह्मणी वृत्तपत्रकांनी प्रचंड विरोध दर्शविला. टिळकांनीही नाराजी व्यक्त केली. राजर्षींनी एकही पाऊल मागे न घेता धैर्याने या विरोधाला तोंड दिले.

कोल्हापूर संस्थानच्या प्रशासनातील स्थिती पाहिल्यास १८९४ मध्ये जनरल खात्यात ८४.५० टक्के ब्राह्मण व १५.५० टक्के ब्राह्मणेतर आणि खासगी खात्यात ८६.७९ टक्के ब्राह्मण व १३.२० टक्के ब्राह्मणेतर अशी स्थिती होती. राजर्षी शाहूंच्या शिक्षण प्रसारामुळे व आरक्षणाच्या धोरणामुळे जे परिवर्तन घडून आले, त्यामुळे १९२२ मध्ये (शाहूंचे निर्वाण झाले त्यावेळी) जनरल खात्यात ३७.८९ टक्के ब्राह्मण व ६२.१० ब्राह्मणेतर आणि खासगी खात्यात २८.२८ टक्के ब्राह्मण व ७१.७० टक्के ब्राह्मणेतर अशी स्थिती निर्माण झाली. त्यामुळे बहुजनांचा प्रशासनातील सहभाग वाढला होता. विविध जातींमधील लोकांना प्रतिनिधित्व मिळण्यास सुरुवात झाली होती.

सर्व जाती-धर्मांच्या लोकांना योग्य प्रतिनिधित्व देणे हे समतावादी आरक्षणाचे तत्त्व आहे. शिक्षण घेण्यासाठी बहुजन समाजाला प्रेरणा मिळावी यासाठीसुद्धा आरक्षण उपयुक्त ठरेल, असे राजर्षींना वाटत होते. आपल्या प्रजेने शिक्षण घेऊन लोकशाहीचे प्रगल्भ व सक्षम नागरिक व्हावे, अशी त्यांची मनस्वी इच्छा होती. अस्पृश्योद्धार, शिक्षण प्रसार, रोजगाराभिमुखता यावर आधारित सामाजिक न्यायाची धोरणे आखून ती त्यांनी प्रभावीपणे राबविली. जातिभेदाच्या रोगावर समतावादी आरक्षण हा उपचार योजण्यात आला. तो स्वातंत्र्यानंतर संविधानाच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर लागू झाला. त्याचा लाभ काही लोकांना झाला; पण योग्य अंमलबजावणी अभावी आणि अनेक गैरसमजांमुळे तो प्रभावी ठरला नाही. त्यामुळे जातिव्यवस्थेच्या अंतासाठी प्रयत्न हेच राजर्षी शाहूंना खरे अभिवादन ठरेल.

0 6 MAY 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवकांनी शाहू विचारांचा अंगीकार करावा

## डॉ. यशवंतराव थोरात; जिल्ह्यात 'जागर शाहू कर्तृत्वाचा'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू महाराज द्रष्टे राजे होते. शंभर वर्षांपूर्वीच्या तत्कालीन परिस्थितीत त्यांनी समतेसाठी लढा दिला. त्यांच्या एकूणच सामाजिक, सर्वांगीण विचारांचा युवकांनी अंगीकार करावा, असे आवाहन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे गुरुवारी जिल्हाभरात 'जागर शाहू कर्तृत्वाचा' या शीर्षांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनकार्याविषयी एकाच वेळी शंभर व्याख्यानांचे आयोजन केले. या विशेष व्याख्यानमालेतील प्रमुख व्याख्यानांतर्गत 'राजर्षी शाहू छत्रपती-जीवन कार्य' या विषयावर डॉ. थोरात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते. याप्रसंगी शाहू महाराज, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा परिषद प्रशासक संजयसिंह चव्हाण आदी उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, खर्‍या अर्थाने जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारे राजे म्हणून शाहू महाराजांचा उल्लेख करावा लागेल. बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी शिक्षणाचे दरवाजे खुले केले होते. महाराजांच्या तत्कालीन समाज विषयक धोरणांचा समाजावर काय प्रभाव पडला आहे यावर संशोधकांनी, अभ्यासकांनी जरूर प्रकाश टाकावा, असे आवाहन डॉ. थोरात यांनी केले. शाहू महाराज म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचे समतेचे, मानवतावादाचे, समाजविषयक विचार थांबता कामा नयेत. ते विचार प्रत्यक्ष कृतीत यावेत. केंद्र व राज्य सरकारने शाहू विचारांवर कार्यरत राहावे. तीच महाराजांना खर्‍या अर्थाने आदरांजली ठरेल.

अध्यक्षीय भाषणात डॉ. पवार म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी सत्तेचा राजदंड खर्‍या अर्थाने बहुजनांच्या उत्थानासाठी वापरला. हा राजदंड वापरणारे ते एकमेव राजे होते. महाराजांच्या अंगी साधुत्व होते. तत्कालीन सामाजिक नकाशा बदलण्याचे काम शाहू महाराजांनी केले. प्रास्ताविक डॉ. भारती पाटील यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर सिद्धनेर्ली येथील शाहीर सदाशिव निकम यांनी शाहू महाराजांचा पोवाडा सादर केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. यशवंतराव थोरात. डावीकडून डॉ. व्ही.एन. शिंदे, जिल्हा परिषदेचे प्रशासक संजयसिंह चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, डॉ. जयसिंगराव पवार, छत्रपती शाहू महाराज, डॉ. भारती पाटील. (छाया : पप्पू अत्तार)

### शंभर नव्हे, ३५० व्याख्याने!

एकाच वेळी शहर व जिल्ह्यात शंभर ठिकाणी व्याख्यानांचे आयोजन प्रशासनातर्फे करण्यात आले होते. शाहू महाराजांच्या प्रेमापोटी तब्बल ३५० ठिकाणी व्याख्यानांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी दिली.

**शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा वृद्धिंगत करून समतेचा संदेश आत्मसात करूया : पालकमंत्री**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केलेले कार्य व त्यांचे विचार पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत. शाहू महाराजांनी दिलेला समतेचा संदेश आचरणात आणून शाहू विचारांचा जागर करूया. बलशाली समाज, राष्ट्र घडविण्यासाठी तरुणांनी पुढे यावे, अशी साद पालकमंत्री सतेज पाटील यांनी विवेकानंद महाविद्यालय येथे आयोजित व्याख्यानात बोलताना घातली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य आर.आर. कुंभार, महादेव नरके, प्रा. एस.एस. अंकुशराव, डॉ. श्रुती जोशी उपस्थित होत्या.

**राजर्षी शाहूंच्या कार्यातील मानवतावादी मूल्ये समजावून घेणे आवश्यक : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्यातील मानवतावादी मूल्ये आजच्या पिढीने समजावून घेतली पाहिजेत आणि ही मूल्ये सोबत घेऊनच आयुष्यात वाटचाल केली पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी रूकडी येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय येथे केले.

विशेष व्याख्यानमालेंतर्गत कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांतकुमार कांबळे होते. डॉ. शिर्के म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची व्याप्ती मोठी आहे. समाजातल्या प्रत्येक घटकाच्या उत्थानाची आस त्यांच्या मनी होती. समाजाच्या दुःखाशी एकरूप होऊन ती दुःखे दूर करणारा हा राजा होता, म्हणूनच ते लोकराजा व राजर्षी म्हणून लोकमान्यता पावले.

**विद्यार्थ्यांनी शाहू विचारांचे दूत बनावे : प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी शाहू विचार आत्मसात करून त्यांचे विचारदूत बनले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील यांनी केले. चंदगड येथील र. भा. माडखोलकर महाविद्यालयात प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांचे 'राजर्षी शाहू महाराज यांचा पर्यावरणविषयक दृष्टिकोन' या विषयावर व्याख्यान झाले. संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. एस.आर. पाटील अध्यक्षस्थानी होते.

दरम्यान, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कराडमधील एस. जी. एम. कॉलेजमध्ये शाहू राजांबद्दल विचार मांडले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 MAY 2022
पुढारी

# विद्यापीठात 'शाहू चित्र प्रदर्शना'स प्रारंभ

## कला महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या ६० निवडक चित्रकृतींचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू छत्रपती महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष सप्ताहांतर्गत शाहू चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन गुरुवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. कला महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा सहभाग हे चित्र प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये हे प्रदर्शन भरविले आहे. यात कोल्हापूरसह ठिकठिकाणच्या सहा कला महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या निवडक ६० चित्रकृती प्रदर्शनात मांडण्यात आल्या आहेत. चित्र प्रदर्शनात काही स्थानिक कलाकारांसह आर्ट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष विजय आचरेकर, मिलिंद मुळीक, संजय शेलार यांच्यासारख्या प्रथितयश चित्रकारांची चित्रे आहेत. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. देविकाराणी पाटील आदी उपस्थित होते. डॉ. मानसिंग टाकळे व प्रा. हर्षवर्धन मणिपद्म यांनी या प्रदर्शनाच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दरम्यान, डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रदर्शनास भेट देऊन राजर्षी शाहूंविषयीच्या वैविध्यपूर्ण चित्रकृतींचे व चित्रकर्त्यांचे कौतुक केले. प्रदर्शन १२ मेपर्यंत सकाळी ११ ते ५ या वेळेत पाहण्यास खुले राहणार आहे. कलाप्रेमी नागरिकांनी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीप्रमुख डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित शाहू चित्र प्रदर्शनातील चित्रकृती पाहताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. भारती पाटील आदी.

पुण्यनगरी

# व्याख्यानातून उलगडले शाहूंच्या कार्याचे आगार

## जिल्ह्यातील १०० ठिकाणी वाहिली शाहू विचारांची गंगा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त गुरुवारी सकाळी ११ वाजता कोल्हापूर शहरासह जिल्ह्यातील विविध १०० ठिकाणी आयोजित व्याख्यानातून विचारवंतांनी शाहूंच्या कार्याचे आगार उपस्थितांसमोर उलगडले.

केवळ कोल्हापूर जिल्ह्यातच नाही तर सांगली, सातारा, बेळगाव, पुणे, अहमदनगर, मुंबई, नाशिक यासह दिल्ली, उत्तर प्रदेश, राजकोट, सिक्कीम संपूर्ण देशभरातील विविध शहरात शाहू महाराजांच्या कार्याचा विचारवंतांनी आढावा घेतला.

व्याख्यानमालेतील मुख्य व्याख्यान शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात झाले. अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी यावेळी 'राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, शाहू छत्रपती महाराज, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते. पालकमंत्री सतेज पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी राजर्षी शाहू महाराजांचे विचार उपस्थितांसमोर मांडले.

0 6 MAY 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जातिअंताचे प्रभावी औषध म्हणजे आरक्षण : डॉ. एस. एस. महाजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जातिअंताचे प्रभावी औषध म्हणजे आरक्षण होय, असे शिवाजी विद्यापीठ वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रतिपादन केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्षानिमित्त येथील कॉमर्स महाविद्यालयामध्ये 'लोकराजा छ. शाहू महाराज यांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य' या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अतुल जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. डॉ. आर. एस. नाईक यांनी आभार मानले. यावेळी प्रा. बी. टी. नाईक हे प्रमुख उपस्थित होते.

पुण्यनगरी



राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी व्याख्यानात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत इतर.

# राजर्षी शाहू महाराजांची जनतेशी नाळ घट्ट जोडलेली होती : कुलगुरू

**रुकडी : प्रतिनिधी**

राजा आणि प्रजा यांचे नाते अलौकिक असते. राजर्षी शाहू महाराजांची जनतेशी नाळ घट्ट जोडलेली होती. महाराज राजमहलात बसून राज्यकारभार पाहात नव्हते, तर ते जनतेत बसून जनतेच्या काय समस्या आहेत ते समजावून घेत व त्या समस्या सोडवत असत. म्हणून महाराज हे लोकराजे ठरले, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

कृतज्ञता पर्व वंदन लोकराजाला अंतर्गत जिल्हा प्रशासन आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शंभर व्याख्यानांचे आयोजन केले आहे. त्यातील एक व्याख्यान रुकडी येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात झाले, त्यामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांतकुमार कांबळे होते. रो. यतिराज भंडारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी योगा प्रश्नमंजूषा स्पर्धेत प्रावीण्यप्राप्त विजेत्यांना पारितोषिके आणि विविध शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. गिरीश मोरे यांनी केले. आभार डॉ. खंडेराव शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. विजय देसाई यांनी केले. सरपंच रफिक कलावंत, शमुवेल लोखंडे, भगवान पोळ, अनिल उपाध्ये, अभय व्हनवाडे, रोहन देसाई, मानसिंग मुसळे आदी उपस्थित होते.

0 6 MAY 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांनी शाहू विचारांचा अंगीकार करावा

## डॉ. यशवंतराव थोरात



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे द्रष्टे राजे होते. तत्कालीन काळात त्यांनी समतेसाठी लढा दिला. त्यांच्या एकूणच सामाजिक, सर्वांगीण विचारांचा युवकांनी अंगीकार करावा, असे उद्‌गार ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी काढले. निमित्त होते शाहू महाराजांच्या कर्तृत्वावर आणि त्यांच्या अप्रकाशित पैलूंवर प्रकाश टाकण्याचे. त्याचाच एक भाग म्हणून गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात डॉ. थोरात यांचे, 'राजर्षी शाहू छत्रपती-जीवन कार्य' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक, अभ्यासक डॉ. जयसिंगराव पवार होते.

यावेळी व्यासपीठावर श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा परिषद प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते. थोरात म्हणाले, वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांच्या आयुष्याला खऱ्या अर्थाने कलाटणी मिळाल्याचे सांगून आजही शाहू महाराजांचे विचार हे मनुष्यत्वाला, माणुसकीला पोषक असल्याचा उल्लेख करून महाराजांच्या एकूणच सामाजिक विचारांचा प्रसार आणि प्रचार सध्याच्या तरुणांनी करावा. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचे समतेचे, मानवतावादाचे, समाजविषयक विचार थांबता कामा नये. ते विचार प्रत्यक्ष कृतीत यावेत. अध्यक्षीय भाषणात डॉ. पवार म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी, सत्तेचा राजदंड खऱ्या अर्थाने बहुजनांच्या उत्थानासाठी वापरला. राजदंड वापरणारे ते एकमेवाद्वितीय राजे होते. महाराजांच्या अंगी साधुत्व होते. तत्कालीन सामाजिक नकाशा बदलण्याचे काम शाहू महाराजांनी केले.

दरम्यान, एकाच वेळी शहरात आणि जिल्ह्यात १०० ठिकाणी व्याख्यानाचे आयोजन प्रशासनातर्फे करण्यात आले होते. तथापि, शाहू महाराजांच्या प्रेमापोटी तब्बल ३५० ठिकाणी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी दिली. तब्बल अडीच तास रंगलेल्या या 'शाहू विचार महोत्सवाने' उपस्थित शाहूप्रेमींना खऱ्या अर्थाने 'यशवंत' केले. प्रास्ताविक डॉ. भारती पाटील यांनी केले. आभार कुलसचिव डॉ. व्ही. एस. शिंदे यांनी मानले. मुख्य कार्यक्रमानंतर शाहीर सदाशिव निकम यांनी पोवाडा सादर केला. यावेळी सिनेट सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

0 6 MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षींचे कार्य आजही प्रेरणादायी

## डॉ. यशवंतराव थोरात : कृतज्ञता पर्वांतर्गत एकाच दिवशी शंभर ठिकाणी व्याख्याने

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : जनतेशी एकरूप होऊन त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारे एकच राजे झाले ते म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज. त्यामुळे शंभर वर्षांनंतरही त्यांचे जीवन आणि कार्य आपल्याला प्रेरणा देणारे आहे, असे स्पष्ट मत ज्येष्ठ अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी आज व्यक्त केले. लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त जिल्ह्यात आज सकाळी 'जागर शाहू कर्तृत्वा'चा या विषयावर शंभर व्याख्याने झाली. त्याअंतर्गत शिवाजी विद्यापीठात श्री. थोरात यांनी 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य' या विषयावर संवाद साधला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार होते.






**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आयोजित व्याख्यानावेळी बोलताना ज्येष्ठ कृषी व अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात. व्यासपीठावर संजयसिंह चव्हाण, राहुल रेखावार, डॉ. जयसिंगराव पवार, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, डॉ. भारती पाटील आदी.**

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. थोरात म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराज हे दरबारात वाढले नाहीत. प्रजेसोबत वाढले. हेच काम छत्रपती शाहू महाराज यांनीही केले. जनतेत राहून जनतेची सेवा करणारे हे राजे होते. बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी शिक्षणाचे दरवाजे खुले केले होते. महाराजांच्या तत्कालीन समाजविषयक धोरणांचा समाजावर काय प्रभाव पडला आहे? यावर संशोधकांनी, अभ्यासकांनी जरूर प्रकाश टाकावा. शाहूंनी मदत केलेल्या कुटुंबांतील पिढ्या सध्या काय करत आहेत. त्यांच्यावर शाहू विचारांचा काय परिणाम झाला आहे. त्याचा संशोधकांनी अभ्यास करावा.''

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराजांचे समतेचे, मानवतावादाचे, समाज विषयक विचार थांबता कामा नयेत. ते विचार प्रत्यक्ष कृतीत यावेत. केंद्र व राज्य सरकारने शाहू विचारांवर कार्यरत राहावे. तीच महाराजांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल.''

डॉ. पवार म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराजांनी, सत्तेचा राजदंड खऱ्या अर्थाने बहुजनांच्या उत्थानासाठी वापरला. हा राजदंड वापरणारे ते एकमेवाद्वितीय राजे होते. तत्कालीन सामाजिक नकाशा बदलण्याचे काम शाहू महाराजांनी केले. वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांच्या आयुष्याला खऱ्या अर्थाने कलाटणी मिळाली. शाहू महाराजांचे विचार तरुणाईने तळागाळापर्यंत पोचवावेत.''

दरम्यान, शाहीर सदाशिव निकम यांनी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित पोवाडा सादर केला. जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील उपस्थित होते.

### ..तर देशाचा सामाजिक नकाशा बदलला असता

अठराव्या शतकात छत्रपती शाहू महाराज दिल्लीच्या गादीवर असते, तर देशातील सामाजिक नकाशा बदलला असता. केवळ विचार केला तरीही सर्व देशात सामाजिक ऐक्यासह प्रगतीचा आलेख डोळ्यांसमोर उभा राहतो. आता हाच विचार पुढे नेण्याची जबाबदारी आपली असल्याचेही श्री. पवार यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
0 6 MAY 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्रदर्शन पाहताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# शिवाजी विद्यापीठात शाहू चित्र प्रदर्शनाला प्रारंभ

कोल्हापूर, ता. ५ : शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित शाहू चित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. कला विद्यालयांतील विद्यार्थ्यांचा सहभाग हे या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्रात प्रदर्शन सुरू राहणार आहे. रा. शि. गोसावी कलानिकेतन, दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूट, कलामंदिर, सांगलीचे कला महाविद्यालय, शिणोली येथील कला महाविद्यालय आणि इस्लामपूर कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कलाकृती साकारल्या आहेत. काही स्थानिक कलाकारांसह आर्ट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष विजय आचरेकर, मिलिंद मुळीक, संजय शेलार यांच्याही कलाकृती आहेत.

कार्यक्रमाला प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. देविकाराणी पाटील आदी उपस्थित होते. डॉ. मानसिंग टाकळे आणि प्रा. हर्षवर्धन मणीपद्म यांचे विशेष सहकार्य मिळाले. दरम्यान, डॉ. जयसिंगराव पवार यांनीही प्रदर्शनास भेट दिली. प्रदर्शन १२ मे पर्यंत सकाळी ११ ते ५ या वेळेत पाहण्यास खुले राहणार असल्याचे समितीप्रमुख डॉ. भारती पाटील यांनी सांगितले.

0 6 MAY 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शतकी व्याख्यानाने राजर्षी शाहूंना मानाचा मुजरा

## जिल्ह्यातील शंभर शाळा, महाविद्यालयांमध्ये एकाचवेळी, एकाच दिवशी शाहू कार्याचा जागर

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाची क्रांती रूजवण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक समाजासाठी एक वसतिगृह बांधून तळागाळांपर्यंत शिक्षणाचा ज्ञानयज्ञ पोहोचवला. राधानगरी धरण बांधून करवीर संस्थान सुजलाम-सुफलाम केले. बहुजनांना न्याय देण्यासाठी कायदे तयार केलेच, परंतु प्रत्यक्ष कृतीतून सामाजिक सलोखा जपला. कोल्हापूर जिल्ह्यातील शंभर शाळा, महाविद्यालयांत शाहूंच्या जीवन कार्यावरील शंभर व्याख्यानांच्या माध्यमातून शाहू कार्याचा जागर केला. या शतकी व्याख्यानाने करवीरनगरीने शाहूंना मानाचा मुजरा केला.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्वांतर्गत राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षनिमिताने जिल्हाधिकारी आणि शंभर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने एकाचवेळी शंभर व्याख्यानांचे आयोजन केले होते. व्याख्यानांमध्ये अनेक शाहू अभ्यासकांनी शाहू कार्यावर विचार मांडले. तळागाळातील लोकांपर्यंत शाहूंचा विचार पोहचवावा, हा या व्याख्यानांचा उद्देश होता.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्यासह मान्यवरांची व्याख्याने शंभर महाविद्यालयात एकाचवेळी झाली. शंभर शाळा, महाविद्यालयात शाहूंच्या कार्यावर व्याख्याने झाली.

### प्रत्यक्ष कृतीतून अभिवादन करा : श्रीमंत शाहू छत्रपती



राजर्षी शाहू महाराजांचा समता व मानवतेचा विचार सर्वदूर पोहोचला पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाने शाहू विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवला पाहिजे. केंद्र व राज्य सरकारने शाहू विचारानेच आपले कार्य केले तरच खऱ्या अर्थाने शाहू महाराजांना ती आदरांजली ठरणार आहे.

### २८ वर्षात २८० वर्षांचे काम : पालकमंत्री




राजर्षी शाहू महाराजांनी २८ वर्षाच्या कारकीर्दीत २८० वर्षांचे काम केले आहे. शाहूंच्या समतेचा संदेश सर्वदूर पोहोचवावा. विविध क्षेत्रात जिल्ह्याला जगाच्या नकाशावर पोहोचवले आहे. विद्यार्थ्यांना भावनिकदृष्ट्या सक्षम करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे.

### शाहूंनी तत्कालीन सामाजिक नकाशा बदलला : डॉ. पवार



सत्तेचा राजदंड खऱ्या अर्थाने बहुजनांच्या उध्दारासाठी वापरणारे राजर्षी शाहू महाराज एकमेव राजे होते. तत्कालीन सामाजिक नकाशा बदलण्याचे काम त्यांनी केले. बहुजन समाजाचे 'आत्मभान" शाहू महाराजांनी जागृत केले. डॉ. आंबेडकर खरे 'लोकमान्य" असल्याचे शाहू महाराजांनी सांगितले होते. त्यावेळी 'काय घडले" आणि 'का घडले" याची उदाहरणे देत शाहूंच्या संपूर्ण कार्यावर डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रकाश टाकला.

### शाहूंचा विचार अंगिकारण्याची गरज : अर्थतज्ज्ञ थोरात



लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज द्रष्टे राजे होते. तत्कालीन काळात त्यांनी समतेसाठी लढा दिला. त्यांच्या एकूणच सामाजिक, सर्वांगीण विचारांचा युवकांनी अंगिकार करावा. आधुनिक युगातही शाहूंचा विचार प्रेरणादायी असल्याने तरूणांनी शाहूंच्या विचारानुसार वर्तन केले पाहिजे, असे डॉ. यशवंतराव थोरात म्हणाले.

Times of India

# SUK signs MoU with Zoological Survey of India

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has signed a memorandum of understanding (MoU) with the Zoological Survey of India (ZSI) for carrying out research by adopting new technology and research methods.

The five-year partnership will also help in unfolding new species and subspecies from the biodiversity of Western Ghats. Dr Dhriti Banerjee, director of ZSI, said, "We are hopeful that the MoU with the SUK will lead to various joint research projects. This has opened a new opportunity for the university and its affiliated colleges to study animal specimens and relics available at various ZSI centres across the country. This will definitely be useful for research development."

SUK vice-chancellor Dr. D T Shirke said, "Students, teachers and researchers from both the institutes should carry out research under the agreement on animal husbandry and social work.

**The partnership will help in unfolding new species and sub-species from the biodiversity of Western Ghats**

In addition to zoology, researchers from other disciplines will also be involved so that the scope of the agreement can be widened and the scope of research expanded."

Giving more information about the reconciliation agreement, assistant professor at SUK's zoology department Dr S M Gaikwad said, "An agreement has been signed between the ZSI researchers and SUK professors and students for the purpose of exchanging research work. Workshops, seminars, conferences and research projects will be jointly organised by both the institutes. The agreement will focus on biodiversity in the Western Ghats due to which biodiversity of the western ghats will be unfolded."